# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-04.05.2026** **वार- सोमवार**

**पंढरपूर**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या पंढरपूर तीथक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीच्या बैठकीत 4 हजार 150 कोटी रुपयांच्या सर्वसमावेशक आराखड्यास मान्यता देण्यात आली. पुढील 50 वर्षाचा विचार करुन या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी करण्यात येणारी विकास कामं येत्या 30 महिन्यात पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी आज मंत्रालयात पंढरपूर तीर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीच्या बैठकीत दिले.

बारामती विधानसभा जागेच्या पोटनिवडणुकीत उप-मुख्यमंत्री सुनेत्रा पवार 2 लाखाहून अधिक मतांनी विजयी झाल्या आहेत. बारामतीकरांनी दादांवर दाखवलेल्या विश्वासाबद्दल त्यांनी बारामतीकरांचे आभार मानले.

**अहिल्यानगर**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले विजयी झाले असून त्यांनी 1 लाख 38 हजार 929 मतांनी विजय मिळविला. अक्षय कर्डिले यांच्या विजयानंतर भाजपानं राहुरीत मोठा जल्लोष केला.

**प्रतिक्रिया**

पश्चिम बंगाल, आसाम आणि पुदुच्चेरीमध्ये भारतीय जनता पार्टीला घवघवीत यश मिळालं. याप्रित्यर्थ भारतीय जनता पार्टी पुणे शहराच्या वतीनं शहर कार्यालयामध्ये भारत मातेचं पूजन करून आनंद व्यक्त करण्यात आला. यावेळी शहराध्यक्ष धीरज घाटे माजी आमदार जगदीश मुळीक यांच्यासह नगरसेवक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. नसरापूरच्या दुर्दैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर कोणताही विजय जल्लोष करायचा नाही असा निर्णय पक्षानं घेतला.

**बारणे**

पिंपरी, चिंचवड आणि मावळमधील भविष्यातील लोकसंख्या विचारात घेऊन वीज यंत्रणा सक्षम केली जाणार आहे. पुढील २० वर्षं डोळ्यासमोर ठेऊन वीज पुरवठ्याचे नियोजन केलं जात असल्याची माहिती शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे. त्यानुसार पिंपरी, चिंचवड, थेरगाव, रावेत, तीर्थक्षेत्र देहूगाव इथं उपकेंद्राची निर्मिती केली जाणार आहे. रहाटणी आणि ताथवडेत अतिउच्चदाब केंद्र उभारण्यात येणार आहे. राहटणीत नवीन रोहित्रही बसविले जाणार आहेत. मावळ लोकसभा मतदारसंघातील पिंपरी, चिंचवड आणि मावळ विधानसभेतील विद्युत विषयक कामासंदर्भात खासदार बारणे यांनी महावितरणाच्या पुण्यातील मुख्य कार्यालयात आढावा बैठक घेतली.

**बालकुमार**

मुलांसाठी गेल्या ५१ वर्षांपासून कार्यरत असलेल्या पुण्यातील अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेतर्फे विविध साहित्य प्रकारातील पुरस्कारांची घोषणा करण्यात आली असून येत्या दहा तारखेला पत्रकार भवनात हे पुरस्कार दिले जाणार आहेत अशी माहिती संस्थेनं एका निवेदनाद्वारे कळविली आहे. प्रिया फुलंब्रीकर, क्षिप्रा शहाणे, डॉक्टर प्रतिमा जगताप, बाबुराव शिरसाट, संध्या देवरुखकर, पुंडलिक वझे, संजय काकडे, डॉ. वर्षा तोडमल, आणि डॉ. प्रसन्न दाभोळकर यंदाचे मानकरी आहेत.

**चित्रपट**

बहुरंग, पुणेतर्फे एकोणिसाव्या आंतरराष्ट्रीय आदिवासी चित्रपट महोत्सवाचं येत्या आठ आणि नऊ तारखेला पुण्यात आयोजन करण्यात आलं आहे. महोत्सवानिमित्त राज्यस्तरीय लघुपट, माहितीपट तसंच आदिवासी कलावंत आणि कला पुरस्कारांचे वितरण होणार आहे. यंदाच्या महोत्सवाचं मुसाडा म्हणजे लाकडी मुखवटा हे बोधचिन्ह आहे. देश-विदेशातील आदिवासी जमातींची सामाजिक, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, वेगळेपणा, जीवनशैली, रूढी-परंपरा, कला, संगीत, नृत्य, नाट्य यातील वेगळेपणा चित्रपट रसिकांना उलगडून दाखविण्याच्या उद्देशानं या दोन दिवसांच्या चित्रपट महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे, अशी माहिती बहुरंग, पुणेचे अध्यक्ष, महोत्सवाचे निमंत्रक डॉक्टर कुंडलिक केदारी यांनी आज पत्रकार परिषदेत दिली. हा महोत्सव घोले रस्त्यावरील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवनात सायंकाळी ५ ते ८ या वेळात होणार आहे.

**कनेक्टींग**

यशवंतराव चव्हाण मुंबई -पुणे द्रुतगती मार्गावरील कनेक्टिंग लिंक लोकार्पणानंतर वाहतुकीसाठी सुरू करण्यात आली आहे. मात्र, प्रवासादरम्यान सेल्फी, छायाचित्र घेण्यासाठी वाहन चालक केबल स्टेड ब्रिज आणि बोगद्याजवळ वाहनं थांबवत असल्याचं प्रशासनाच्या निदर्शनास आलं आहे. द्रुतगती मार्गावर वाहनं थांबवण्यास परवानगी नसून वाहनधारकांसाठी अपघाताचा धोका असल्यानं ते टाळावं, असं आवाहन महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीनं करण्यात येत आहे. महामार्ग पोलिसांनी अधिसूचनेद्वारे मुंबई-पुणे कनेक्टिंग लिंक प्रकल्पासाठी वेग मर्यादा जाहीर केली आहे. तसंच बोगद्यात हलक्या मोटार वाहनांसाठी ताशी १०० किलोमीटर वेग मर्यादा आणि बस आणि प्रवासी वाहनांसाठी ताशी ८० किलोमीटर वेग निश्चित केला आहे. कनेक्टिंग लिंक प्रकल्पातील दोन बोगदे आणि दोन पुलांवर अहोरात्र सीसीटीव्ही यंत्रणेचं लक्ष आहे. यावर देखरेख ठेवण्यासाठी स्वतंत्र नियंत्रण कक्ष असून द्रुतगती मार्गावर थांबणाऱ्या गाड्यांची माहिती महामार्ग पोलिसांना दिली जाणार आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात उद्या कमाल 38 अंश तर किमान 22 अंश सेल्सियस तापमान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**